नि.दि.दावा नं.७५/२०१३
वसंत विरुध्द ईश्वरा
CNR-MHSN14000335-2013

## नि.क्र.१९५ वरील आदेश

प्रतिवादी नं.१ ने प्रस्तुतचा अर्ज कैफियत नाही हा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं.१ ने असे कथन केले आहे की, तो वयस्कर असल्याने वारंवार आजारी असतो. त्यामुळे आवश्यक ती कागदपत्र उपलब्ध करुन वकिलांची भेट घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादी नं.१ च्या विरुध्द कैफियत नाही हा आदेश रद्द केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून सदरचा आदेश रद्द करण्याची विनंती केलेली आहे. वादीने सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज हा खोटा व लबाडीचा असल्याने फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर मी या मतास आलो आहे की, प्रतिवादी नं.१ याने अर्जात नमूद केलेल्या कारणांचा विचार करता, त्याच्या विरुध्दचा विना कैफियत हा आदेश रद्द केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी नं.१ याची कैफियत रेकॉर्डवर आल्यास न्यायदानास मदत होईल. सत्य असत्य बाजू न्यायालयाच्या समोर येतील. म्हणून प्रतिवादी नं.१ च्या विरुध्द कैफियत नाही असा झालेला आदेश वादीला खर्च म्हणून र.रु.१००/– देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

Digitally signed
by Haridas
Sandipan Satpute
Date: 2020.01.31
14:55:04 +0530

शिराळा
दिनांक ३१/०१/२०२०

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. K. Jadhav (Steno. Grade-3) |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 31/01/2020 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 31/01/2020 |
| Order uploaded on | : | 31/01/2020 |